# जाहीरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २००९

## (भरतीचा दिनांक ८/३/२०१० )

**जाहीरात क्रमांक : पो.अ.गो./कक्ष-७-पो.भ.-०९/२०१०  ठिकाण- गोंदिया  दिनांक ०३/०२/२०१०**

गोंदिया जिल्हा पोलीस घटकात **दिनांक ०८/०३/२०१० रोजी** पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे. उमेदवारांना या कार्यालयामार्फत प्रसिध्द करण्यात आलेले आवेदन अर्ज खाली सुचना १ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येतील. आवेदन अर्ज उमेदवाराने रु. ५०/- ची इंडीयन पोस्टल आर्डर किंवा डिमांड ड्राफ्ट **"P.A. to S.P. Gondia"** या नावाने जमा केल्यानंतर देण्यात येतील. विहीत आवेदन अर्ज भरुन आवश्यक त्या कागदपत्रासह व्यक्तीशः पोलीस मुख्यालय कारंजा गोंदिया या ठिकाणी दि. ०८/०३/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत येणा-या उमेदवारांना प्रवेश दिला जाईल. त्यानंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही. आवेदन अर्जाची विक्री दि. ०८/०२/२०१० ते ०५/०३/२०१० पर्यंत करण्यात येईल.

गोंदिया जिल्हा पोलीस घटकात खाली दर्शविल्याप्रमाणे पोलीसांची रिक्त पदे भरण्याकरीता पोलीस भरती आयोजित करण्यात आलेली आहे.

| पद | अजा १३% | अज ७% | विज- अ ३% | भज -ब २.५% | भज -क ३.५% | भज-ड २% | विमाप्र २% | इमाव १९% | खुला ४८% | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पोलीस शिपाई (पुरुष ) | २९ | १६ | ०७ | ०६ | ०८ | ०४ | ०४ | ४२ | १०७ | २२३ |
| पोलीस शिपाई (महिला ) | १२ | ०७ | ०३ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | १८ | ४६ | ९५ |
| एकुण पदे | ४१ | २३ | १० | ०८ | ११ | ०६ | ०६ | ६० | १५३ | ३१८ |

- **खेळाडु, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, गृहरक्षक दल, महिला यांचेकरीता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ट आहे. (संदर्भ : शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही -१०९७/ प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि. १६/३/१९९९)**

**टिप :-** वर नमुद रिक्त पदांमध्ये अनुकंपा तत्वातील नियुक्तीसंबंधी ५% पदे राखीव आहेत. तसेच वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असु शकते, त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका-यास राहतील. **सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवुन दर्शविण्यात आलेली आहेत.**

**वेतनश्रेणी :-** शासन वित्त विभाग अधिसुचना क्र. वेपुर-१२०९/प्र.क्र.२७/सेवा-९ दिनांक २२/०४/२००९ अन्वये पोलीस शिपाई पदाकरिता मंजुर करण्यात आलेल्या वेतनश्रेणीनुसार अनुज्ञेय वेतन व भत्ते, शासन निर्णय क्रमांक अ.नि.ओ. १००५५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये नियुक्तीस पात्र ठरणा-या पोलीस शिपायांस " परिभाषीक अंशदान निवृत्तीवेतन योजना " लागु ठरेल.

**वयोमर्यादा :-** दि. २८/०२/२०१० रोजी वय १८ वर्षे पुर्ण आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे, मागासवर्गीयांना ५ वर्षे शिथीलक्षम.

**टिप :-** पोलीस शिपाई पदाच्या भरतीकरीता ज्या उमेदवारांनी दिनांक १०/८/०९ रोजी अर्ज दाखल केले असतील त्यांची वयोमर्यादा (Cut off date) दिनांक ३१/७/०९ रोजी निश्चीत करण्यात येईल. तसेच दिनांक ९/११/०९ रोजी ज्यांनी अर्ज दाखल केले असतील त्यांची वयोमर्यादा (Cut off date) दिनांक ३१/१०/२००९ रोजी निश्चीत करण्यात येईल.

**शैक्षणिक अर्हता :-** महाराष्ट्र माध्यमीक व उच्च माध्यमीक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमीक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परीक्षेस समकक्ष (राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकेंडरी स्कुल परिक्षा तसेच सीबीएसई बारावी परीक्षा या दोन्ही परिक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यात येणा-या १२ इयत्तेच्या परीक्षेसी समकक्ष आहेत) घोषीत केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**शारीरिक पात्रता :-** **महिला** : किमान उंची : १५५ से.मि.

**पुरुष** : किमान उंची : १६५ से.मि., **छाती** : न फुगवता ७९ से.मी. (न फुगविलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा.)

**चाचणी :** शारीरिक पात्रता पुर्ण करणा-या उमेदवारांची १०० गुणांची शारीरिक चाचणी, ७५ गुणांची लेखी चाचणी आणि २५ गुणांची मुलाखत चाचणी घेण्यात येईल.

शारीरिक चाचणी खालीलप्रमाणे राहील :

पुरुष : (१) १०० मिटर्स धावणे, (२) ८०० मिटर्स धावणे, (३) पुल अप्स (१०), (४) लांब उडी, (५) गोळा फेक.

महिला : (१) २०० मिटर्स धावणे, (२) ३ किमी चालणे, (३) लांब उडी, (४) गोळा फेक (४ कि.ग्रा.)

**लेखी चाचणी** पुढील प्रमाणे राहील : (१) अंकगणित, (२) सामान्य ज्ञान व चालु घडामोडी, (३) मराठी भाषेत निबंध लेखन.

**नक्षलग्रस्त भागासाठी विशेष तरतुद :-** शासनाने घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील रहिवासी असलेल्या अनुसूचीत जमातीसाठी व नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत/गंभीर जखमी झालेल्या पोलीस बातमीदार, पोलीस पाटील व पोलीस कर्मचारी यांच्या मुलांमधील इयत्ता ७ वी परीक्षा उत्तीर्ण उमेदवार अर्ज करु शकतात.

तसेच सदर महिला व पुरुष उमेदवारांना उंचीमध्ये २.५ सें.मी. सुट देय राहील आणि पुरुष उमेदवारांच्या छातीच्या मोजमापात सुट देय राहील.

**(टिप :- हि तरतुद शासन निर्णय क्रमांक एनएएक्स-२००४/प्रक्र ४८/विशा-१ ब, दिनांक ७/१२/२००४ च्या नुसार घोषीत केलेल्या नक्षलग्रस्त भागांमध्ये (जिल्हयांमध्ये) होणाऱ्या पोलीस भरतीसाठी आहे. इतर ठिकाणी ही सुट मिळणार नाही. तसेच असे उमेदवार नक्षलग्रस्त भागाच्या बाहेर बदलीसाठी पात्र असणार नाही.)**

**महिलांसाठी आरक्षण :-** उपरोक्त नमुद घटकांतील पदामध्ये शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी ३० % इतके समांतर आरक्षण असून एखाद्या संवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे पात्र पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येतील.

**महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.-४१५/का-२, दि. २५/५/२००१ निर्गमीत केलेल्या निर्णयानुसार महिलांसाठी राखीव असलेल्या ३० % समांतर आरक्षणाकरिता (अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती वगळुन) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**गृहरक्षक दल (होमगार्ड) आरक्षण** : एकुण पदांच्या ५ % इतके समांतर आरक्षण पदे गृहरक्षक दलातुन भरण्यात येतील. उमेदवारांची भरतीच्या दिनांकापुर्वी अथवा भरतीच्या नियोजित दिनांकापर्यंत गृहरक्षकदलामध्ये कमीत कमी ३ वर्ष सेवा पुर्ण झालेली असणे आवश्यक आहे.

**माजी सैनिक आरक्षण :** एकुण पदाच्या १५ % इतके समांतर आरक्षण पदे ही माजी सैनिकातून भरण्यात येतील. तसेच त्यांच्या वयामध्ये त्यांची सैन्यदलात जितकी सलग सेवा (सहा महिन्यापेक्षा कमी नाही) झाली असेल तेवढी वर्ष अधिक ३ वर्षे इतकी सवलत देय राहील.

**प्रकल्पग्रस्त आणि भुकंपग्रस्त आरक्षण :** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भुकंप-१००९/प्र.क्र. २०७/२००९/१६-अ, दिनांक २७/८/२००९ अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांच्यासाठीच राखुन ठेवुन या आरक्षणांतर्गत भुकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढुन भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागु राहील. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील.

**टिप** :- प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त यांच्या नेमणुका यादीतील जेष्ठतेनुसार न करता जाहिरातीद्वारे स्पर्धा परीक्षा घेवुन गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल (संदर्भ (१) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक एमआयएस-२००८/प्रक्र५१८/पोल-५अ, दिनांक २६/८/०८ आणि (२) सर्व जिल्हाधिकारी यांना लिहीलेले, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रकल्प-१००९/प्रक्र २३९/०९/१६-अ, दिनांक ३०/९/०९ चे पत्र)

**खेळाडु उमेदवार :** एकुण पदांच्या घटक निहाय ५ % पदे खेळाडु उमेदवारातुन भरण्यात येतील. खेळांडुबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशानुसार भरण्यात येतील. सदरची सुट फक्त पूढे नमुद क्रिडा कामगिरी करणा-या खेळाडुसाठीच देय राहील.

**(१) राज्यस्तर (आंतरजिल्हा) पदक विजेता, (२) अखील भारतीय आंतर विद्यापीठ स्तर प्रतिनिधीत्व, (३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधीत्व (४) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधीत्व.**

**खेळांची नावे :** १) आर्चरी(धनुविद्या), २) ॲथलेटिक्स व क्रास कंन्ट्री ३) ॲक्वेटिक्स(पाण्यातील खेळ), ४) बॅडमिंटन ५) बॉक्सीग, ६) बॉस्केट बॉल, ७) जिम्नॅस्टिक, ८) हँडबॉल ९) खो-खो १०) ज्युडो ११) कबडडी १२) रोवींग १३) लॉन टेनीस १४) शुटींग १५) वेटलिफटींग १६) टेबल टेनीस १७) व्हॉलीबॉल १८) तायक्वांदो १९) कुस्ती २०) हॉकी २१) बिलीयर्डस व स्नुकर २२) फुटबॉल २३) कराटे २४) पॉवर लिफटींग २५) बॉडी बिल्डींग २६) क्रिकेट २७) कॅनोईग-कयाकिंग(होडी वल्हविणे) २८) रग्बी

तसेच पुरुष व महिला खेळाडुंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ सें.मी. इतकी सुट देय राहील.

**टिप** :- खेळाडु उमेदवारांनी त्यांचे खेळाविषयीचे प्रमाणपत्र संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडुन तपासणी केलेले असणे आवश्यक राहील.

**अर्जदारांसाठी आवश्यक सुचना :**

१) "आवेदन अर्ज " हे खालील ठिकाणी दिनांक ०८/०२/२०१० ते ०५/०३/२०१० चे कालावधीत सकाळी १०.०० ते १७.०० वा. पर्यंत वितरीत केले जातील. घटक कार्यालयातुन उपलब्ध केलेले आवेदन अर्जच उमेदवाराने भरणे अनिवार्य राहील. झेरॉक्स केलेले आवेदन अर्ज किंवा घटक कार्यालयाचा शिक्का व अनुक्रमांक नसलेले अर्ज किंवा खाजगी स्तरावर छापलेले आवेदन अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

**ठिकांणांची नावे (वेळ १०.०० वा. ते १७.०० वा. पर्यंत)** (अर्ज मिळण्याचा शेवटचा दिनांक दि. ०५/०३/२०१० रोजी १७.०० वा. पर्यंत राहील .)

१) उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय गोंदिया, २) पोलीस स्टेशन गोंदिया शहर ३) पोलीस मुख्यालय गोंदिया (कारंजा)
४) उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय तिरोडा, ५) उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय आमगांव, ६) उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय देवरी

**२)** " आवेदन अर्ज " घेतांना रुपये ५०/-चा इंडीयन पोस्टल ऑर्डर किंवा फक्त राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट **"P.A. to S.P.GONDIA"** या नावानेच देण्यात यावा . राष्ट्रीयकृत बॅकेव्यतरिक्त इतर सहकारी अथवा स्थानिक बॅकेचे डिमांड ड्राप्ट स्विकारले जाणार नाही.

**३)** छाननीच्या वेळी मुळ प्रमाणपत्रे दाखवणे बंधनकारक आहे.

४) अर्जदाराने अर्जासोबत खालील (लागु असलेल्या) प्रमाणपत्रांची सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिका-यांने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

१. शाळा सोडल्याचा दाखला.
२. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक.
३. **सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ५/११/२००९ नुसार मागासवर्ग उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदारानी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.**
४. प्रकल्पग्रस्त असल्यास त्याबाबत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र.
५. अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र.
६. सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन-क्रिमीलियर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र.
७.. विविध आरक्षण प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे प्रमाणपत्र.

प्रमाणपत्राच्या छाननीच्या वेळी उमेदवारांनी उपरोक्त मुळ (Original) प्रमाणपत्रे दाखवणे बंधनकारक आहे. मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

१) सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करणेस पात्र राहतील.
२) सदर पोलीस भरतीची विस्तृत माहिती www. maharashtra.gov.in /www. mahapolice.gov.in या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध राहील.
३) पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.
४) पोलीस भरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिक ईजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.
५) भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.
६) पोलीस भरतीची प्रक्रिया सुरु असतांना कोणत्याही उमेदवाराने मोबाईल फोन (भ्रमणध्वनीयंत्र) सोबत आणु नये किंवा त्याचा वापर सुध्दा करु नये.
७. पोलीस शिपाई पदाच्या भरतीकरीता ज्या उमेदवारांनी दिनांक १०/८/२००९ किंवा ९/११/२००९ च्या अनुषंगाने आवेदन अर्ज खरेदी केले असतील तेच आवेदन अर्ज दि. ८/३/२०१० पासुन सुरु होणा-या पोलीस भरती साठी ग्राहय समजण्यांत येतील. तसेच, या जाहिरातीपुर्वी खरेदी केलेल्या आवेदन अर्जातील अ.क्र. ९ वर नमुद मजकुर रद्द समजण्यांत येऊन त्या ऐवजी असे वाचावे " अर्जदार मागास प्रवर्गाचे असल्यास जातीचा दाखला सक्षम प्राधिका-याने दिलेला असावा, व जात पडताळणीचे वैधता प्रमाणपत्र सोबत जोडावे. **अर्जदारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यांत येणार नाही. (सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दिनांक ०५/११/२००९)** "

**( प्रदीप देशपांडे )**
पोलीस अधीक्षक,
**गोंदिया.**

D:\rsheet\gredetion\PB-2009-10\LETTER.DOC